**मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.**

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

**दावा क्रमांक ४०/२०२१**

विसापूर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. **---- वादी**

***विरुध्द***

गणेश अर्जुन नागवडे आणि इतर. **---- प्रतिवादी**

**<u>निशाणी-६९ वरील आदेश</u>**

१) वादी संस्थेने सदरचा अर्ज निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरिता केला असुन वादीच्या कथनाप्रमाणे न्यायालयाने दि.२६/०८/२०२१ च्या निशाणी-५ वरील आदेशान्वये प्रतिवादी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना प्लॉटवर पुढील बांधकाम करण्याकरिता दाव्याचा निकाल लागेपर्यंत मनाई करण्यात आली होती.

२) प्रतिवादी यांनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे संस्थेने निशाणी-३९ कडे न्यायालयाचा अपमान केल्यामुळे अर्ज दाखल केला. त्यानंतरसुध्दा प्रतिवादी यांनी बांधकाम चालू ठेवले आणि म्हणून माहे मार्च-२०२३ मध्ये संस्थेने निशाणी-३९ मध्ये अर्ज दुरुस्ती करण्या करिता निशाणी-५३ कडे अर्ज दाखल केला होता. प्रतिवादी यांनी मार्च-२०२३ पर्यंत बांधकाम पूर्ण केले आणि त्यांनी निशाणी-५ आदेशाचे उल्लंघन केले. वादीच्या निशाणी-५३ अर्ज मंजूरीनुसार संस्थेने निशाणी-३९ मध्ये दुरुस्ती केली. त्यानंतर प्रतिवादीने दि.१४/०६/२०२३ रोजी बांधकाम केलेल्या घरामध्ये वास्तुशांती आणि सत्यनारायण पूजा केले व प्रतिवादी यांनी निशाणी-३९ अर्ज

प्रलंबित असतांना आणि निशाणी-५ आदेशाची उल्लंघन करुन प्लॉट नं. ६ वर इमारत बांधकाम केले, त्यामुळे वादी संस्थेला निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

३) प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी वादीच्या अर्जाला उत्तर दाखल करुन वादीचे म्हणणे नाकारले. संस्थेने निशाणी-५३ वरील अर्ज मंजूरीनुसार दुरुस्ती केली आहे. त्यानंतर वादीने दि.१५/१२/२०२३ रोजी पुरावा बंद केला आणि त्यानंतरसुध्दा प्रतिवादीने त्यांचा पुरावा दिला. वादी संस्थेने सदरचा अर्ज केवळ पुरावा गोळा करण्या करिता दाखल केला आहे.

४) वादी आणि प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. वादीने अर्जामध्ये सुचवलेली दुरुस्ती मंजूर करणे योग्य आहे काय? हा वादाचा मुद्दा निर्माण होतो. वादीने अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादींनी निशाणी-५ आदेशाचे उल्लंघन करुन प्लॉट नं. ६ वर बांधकाम करुन घर बांधले आणि त्यानंतर वास्तुशांती आणि सत्यनारायण पूजा केली. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता दिसुन येते की, वादी संस्थेने निशाणी-३९ कडे प्रतिवादी विरुध्द आदेश ३९ नियम २ (अ) दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये अर्ज दाखल करुन प्रतिवादींनी निशाणी-५ वरील आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याकरिता अर्ज दाखल केला. त्यानंतर वादीने निशाणी-३९ च्या अनुषंगाने पुरावा दाखल केला आणि प्रतिवादीच्या वकीलांनी उलटतपासणी घेतली. त्यानंतर वादीने निशाणी-५३ कडे अर्ज दाखल करुन निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरिता सुचविले आणि त्यानुसार वादीचा अर्ज मंजूर करण्यात आला. निशाणी-३९ अर्ज दुरुस्तीनंतर वादीने दाव्यात कागदपत्र दाखल केली आणि त्यानंतर प्रतिवादीने निशाणी-३९ च्या अर्जाच्या अनुषंगाने पुरावा दाखल केला. परंतू उलटतपासणी प्रलंबित असतांना वादीने सदरचा अर्ज दाखल

केला. वादी संस्थेने अर्जामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रतिवादी विरुध्द निशाणी-५ आदेशान्वये प्लॉट नं.६ वर बांधकामा करिता मनाई हुकूम असतांना बांधकाम केले आणि वास्तुशांती केली. त्यामुळे या सर्व बाबीचां निशाणी-३९ अर्जामध्ये समावेश होणे आवश्यक असल्याचे दिसुन येत आहे. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता स्पष्ट होत आहे की, वादीने अर्जामध्ये सुचवलेली दुरुस्ती योग्य आहे आणि सदर बाबींचा निशाणी-३९ मध्ये समावेश न केल्यास आणि त्यानुसार दुरुस्ती न केल्यास वादीचे नुकसान होईल. वादीने या अर्जासोबत प्रतिवादीने इमारतीत वास्तुशांती केल्याची कागदपत्रे दाखल केली. वादीने निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती करण्याचे परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच ज्या कारणास्तव निशाणी-३९ अर्ज दाखल केला त्या अर्जातील मागणीमध्ये कोणताही बदल होणार नाही. करिता वादीचा अर्ज मंजूर करणे योग्य आहे. करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) वादीचा अर्ज रु.३००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी निशाणी-३९ अर्जामध्ये दुरुस्ती करावी आणि दुरुस्ती प्रत प्रतिवादी यांना देण्यात यावी.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २३/०४/२०२४

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.